सागराने छेडलेला

गायिका /संगीत ः वैशाली सामंत     गीत ः वैभव जोशी

सागराने छेडलेला हा तराणा
ऐकू येतो का तुझ्या ओल्या क्षणांना
अशी हुरहुरती लय जशी हुळहुळती सय
साद देते का तुझ्याही शांततेला सांग ना
सागराने छेडलेला हा तराणा
ऐकू येतो का तुझ्या ओल्या क्षणांना

रोज होते का स्वरांची अंबरी उधळण
रोज रात्री तारकांनी सजते का अंगण
स्वैर वाऱ्यातुनही वाजते का बासरी
सांग येतो का असा चांद वाळुच्या घरी
आर्त वेळी एक गाणे जागते का सांग ना
सागराने छेडलेला हा तराणा
ऐकू येतो का तुझ्या ओल्या क्षणांना

त्या किनारी रात झरते का अशी मध्यम
त्या तिथे ही लाट हळवी गाते का सरगम
सुर आलापामध्ये चिंब होतो ना जसा
आठवांच्या सोबती श्वास भिजतो का तसा
भास होतो का कुणाला भेटल्याचा सांग ना
सागराने छेडलेला हा तराणा
ऐकू येतो का तुझ्या ओल्या क्षणांना